# भूगोल

इयत्ता नववी



# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# भूगोल

## इयत्ता नववी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

752VF7

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन–अध्यापनासाठी उपयुक्त दृक्‌श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१७
दुसरे पुनर्मुद्रण : २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४.
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**भूगोल विषय समिती :**

डॉ. एन. जे. पवार, अध्यक्ष
डॉ. सुरेश जोग, सदस्य
डॉ. रजनी माणिकराव देशमुख, सदस्य
श्री. सचिन परशुराम आहेर, सदस्य
श्री. गौरीशंकर दत्तात्रय खोबरे, सदस्य
श्री. र. ज. जाधव, सदस्य-सचिव व संयोजक

**भूगोल अभ्यास गट :**

डॉ. हेमंत मंगेशराव पेडणेकर
डॉ. कल्पना प्रभाकरराव देशमुख
डॉ. सुरेश गेणूराव साळवे
डॉ. हणमंत लक्ष्मण नारायणकर
डॉ. प्रद्युम्न शशिकांत जोशी
श्री. संजय श्रीराम पैठणे
श्री. श्रीराम रघुनाथ वैजापूरकर
श्री. पुंडलिक दत्तात्रय नलावडे
श्री. अतुल दीनानाथ कुलकर्णी
श्री. बाबुराव श्रीपती पोवार
डॉ. शेख हुसेन हमीद
श्री. ओमप्रकाश रतन थेटे
श्री. पद्माकर प्रल्हादराव कुलकर्णी
श्री. शांताराम नथ्थू पाटील
श्रीमती शोभा सुभाष नागरे
श्रीमती मंगला गुडे-विश्वेकर

**चित्रकार :** श्री. भटू रामदास बागले

**मुखपृष्ठ व सजावट :** श्री. भटू रामदास बागले

**नकाशाकार :** श्री. रविकिरण जाधव

**अक्षरजुळणी :** मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**कागद :** ७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश :** एन्/पिबी/२०२१-२२/(७५,०००)

**मुद्रक :** मे. कोदंडा प्रिंटर्स, हैदराबाद

**निर्मिती :**

श्री. सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. विनोद गावडे, निर्मिती अधिकारी
श्रीमती मिताली शितप, सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

श्री. विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा

व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**

दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता

यांचे आश्वासन देणारी **बंधुता**

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**

आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी

**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

नववीच्या वर्गात तुमचे स्वागत आहे. भूगोल विषयातील अनेक संज्ञा व संकल्पना भूगोलाच्या पाठ्यपुस्तकांतून तुम्ही शिकला आहात. यापुढील अधिक सखोल संकल्पना असलेले, इयत्ता नववी भूगोलाचे हे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आनंद वाटतो.

आपली 'पृथ्वी' हा सजीवसृष्टी असलेला अवकाशातील एकमेव ज्ञात ग्रह आहे. पृथ्वीवर अनेक प्रकारच्या नैसर्गिक घटना घडत असतात. या घटनांचा परिणाम सजीव तसेच निर्जीव गोष्टींवर होत असतो. भूगोलामध्ये 'पर्वत, पर्वत राहत नाही!' असे म्हटले जाते. याचा नेमका अर्थ काय ? या व अशा अनेक बाबी तसेच अशा घटनांशी कसे जुळवून घ्यावे, यासाठी भूगोल विषयाचा अभ्यास आवश्यक असतो.

तुम्ही अनेक वस्तू खरेदी करता आणि वापरता; परंतु या वस्तू नेमक्या कशा तयार झाल्या, त्या दुकानात कोठून आल्या, या वस्तूंचा मूलस्रोत नेमका कोणता, मानव आणि निसर्ग यांच्या आंतरक्रियेतून मानवी जग कसे निर्माण होते, मानवी समूह, संस्कृती, समाज व अर्थकारण यांचा विकासाशी असणारा संबंध, आंतरजालाचा वापर, परिणाम इत्यादी बाबी या पाठ्यपुस्तकातून तुम्ही समजून घेणार आहात.

भूगोल विषयाचा अभ्यास सूक्ष्मदृष्टीने करणे आवश्यक असते. त्यासाठी उपलब्ध असलेली अनेक साधने, जसे– नकाशे, आलेख, मापनयंत्र इत्यादींचा आवश्यकतेनुसार वापर करा. शाळेमध्ये या पाठ्यपुस्तकात दिलेल्या कृती काळजीपूर्वक करून भूगोल विषय आत्मसात करा.

तुम्हा सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा !



(डॉ. सुनिल मगर)

**संचालक**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे

दिनांक : २८ एप्रिल २०१७, अक्षय्यतृतीया

भारतीय सौर दिनांक : ८ वैशाख १९३९

| अ. क्र. | क्षेत्र | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|---|
| १. | प्रात्यक्षिक भूगोल | वितरणाचे नकाशे | ● वेगवेगळ्या भौगोलिक तंत्रांचा वापर करून तसेच उद्‌देशात्मक नकाशांचे विश्लेषण करून माहितीचे सादरीकरण करता येणे.<br>● बहुउद्‌देशीय नकाशे तयार करण्यासाठी व त्या संदर्भात अनुमान काढण्यासाठी सामग्रीचे (Data) वर्गीकरण करता येणे. नकाशांवर स्थापित करता येणे.<br>● भौगोलिक साधनांचा उपयोग करून विविध स्थळे व प्रदेश शोधता येणे, स्थापित करता येणे. अहवाल तयार करता येणे. |
| २. | प्राकृतिक भूगोल | अंतर्गत हालचाली | ● मानव आपत्ती व्यवस्थापनासाठीची तयारी कशी करतो व आपत्तींना कसा प्रतिसाद देतो, याचा शोध घेता येणे.<br>● भौगोलिक घटकांचे परीक्षण करणे, अनुमान काढणे. |
| ३. | प्राकृतिक भूगोल | बाह्यप्रक्रिया | |
| ४. | प्राकृतिक भूगोल | वृष्टी | ● भौगोलिक साधनांच्या साहाय्याने माहितीचे निरीक्षण करणे, भाष्य करणे व त्या संदर्भात नकाशे तयार करणे.<br>● नैसर्गिक घटकांचे निरीक्षण, वर्गीकरण करून अनुमान काढणे. त्यांमधील कार्यकारणभाव सांगता येणे. |
| ५. | प्राकृतिक भूगोल | सागरजलाचे गुणधर्म | ● नैसर्गिक घटकांमधील 'चल' अभ्यासणे, परीक्षण करणे व अनुमान काढणे. |
| ६. | सामान्य भूगोल | आंतरराष्ट्रीय वाररेषा | ● भौगोलिक माहितीच्या आधारे विविध प्रश्नांवर उपाय करता येणे.<br>● एखाद्या प्रदेशाच्या स्थान-विस्ताराबाबत नकाशा व प्रतिमांवर भौगोलिक जाळी (वृत्त) मांडून उत्तरे देता येणे. |
| ७. | मानवी भूगोल | अर्थशास्त्राशी परिचय | ● आर्थिक परस्परावलंबित्वाचे आकृतिबंध (Pattern) व आंतरजोड ओळखता येणे.<br>● वितरणातील आकृतिबंध आणि मानवी क्रियांच्या प्रसारणाची प्रक्रिया यांचे परीक्षण करता येणे.<br>● एखाद्या प्रदेशातील प्राकृतिक पर्यावरणाचा तेथील अर्थकारण व व्यापार यांवर होणारा परिणाम विशद करता येणे. |
| ८. | मानवी भूगोल | व्यापार | |
| ९. | मानवी भूगोल | नागरीकरण | ● वस्त्यांच्या निर्माणामध्ये मानवाने भौगोलिक घटकांचा कसा वापर केला, तसेच स्थानिक प्राकृतिक पर्यावरणाशी अनुकूलन व सुधारणा तो कशा करत गेला याचे परीक्षण करता येणे. |
| १०. | मानवी भूगोल | वाहतूक व संदेशवहन | ● पर्यावरण, स्थळांबद्‌दलच्या जाणिवा व मूल्ये यांतील बदलांमुळे व्यक्तीची वैयक्तिक वर्तणूक प्रभावित होते हे जाणणे.<br>● विशिष्ट प्राकृतिक व राजकीय घटकांचे ऐतिहासिक घटना, लोकांच्या हालचाली आणि पर्यावरणाशी होणारे अनुकूलन यांचे वर्णन करता येणे. |
| ११. | मानवी भूगोल | पर्यटन | ● प्रदेशासंदर्भात भौगोलिक अनुमाने व अंदाज करण्यासाठी माहितीचे संकलन करता येणे.<br>● माल, सेवा व तंत्रज्ञान यांच्यामुळे एखाद्या प्रदेशातील विविध स्थाने एकमेकांस जोडली जातात, ते सांगता येणे.<br>● नकाशाचे निरीक्षण करून अनुमान करणे व निष्कर्ष काढणे.<br>● नकाशे व इतर भौगोलिक साधने वापरून एखाद्या प्रदेशासंदर्भातील प्रश्नांची उत्तरे देता येणे. |

## – शिक्षकांसाठी –

- ✓ पाठ्यपुस्तक प्रथम स्वतः समजून घ्यावे.
- ✓ प्रत्येक पाठातील कृतीसाठी काळजीपूर्वक व स्वतंत्र नियोजन करावे. नियोजनाशिवाय पाठ शिकवणे अयोग्य ठरेल.
- ✓ अध्ययन-अध्यापनामधील 'आंतरक्रिया', 'प्रक्रिया', 'सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग' व आपले सक्रिय मार्गदर्शन अत्यंत आवश्यक आहे.
- ✓ शाळेमध्ये असलेली भौगोलिक साधने आवश्यकतेनुसार वापरणे हे विषयाच्या सुयोग्य आकलनासाठी गरजेचे आहे. त्या अनुषंगाने शाळेतील पृथ्वीगोल; जग, भारत, राज्य हे नकाशे, नकाशासंग्रह पुस्तिका इत्यादींचा वापर अनिवार्य आहे, हे लक्षात घ्यावे.
- ✓ पाठांची संख्या मर्यादित ठेवली असली, तरीही प्रत्येक पाठासाठी किती तासिका लागतील याचा विचार करण्यात आलेला आहे. अमूर्त संकल्पना अवघड व क्लिष्ट असतात, म्हणूनच अनुक्रमणिकेत नमूद केलेल्या तासिकांचा पुरेपूर वापर करावा. पाठ थोडक्यात आटपू नये, त्यामुळे विद्यार्थ्यांवर बौद्धिक ओझे न लादता विषय आत्मसात करण्यास त्यांना मदत होईल.
- ✓ इतर सामाजिक शास्त्रांप्रमाणे भौगोलिक संकल्पना सहजगत्या समजणाऱ्या नसतात. भूगोलाच्या बहुतेक संकल्पना या शास्त्रीय आधारावर व अमूर्त बाबींवर अवलंबून असतात. गटकार्य, एकमेकांच्या मदतीने शिकणे या बाबींना प्रोत्साहन द्यावे. त्यासाठी वर्गरचना बदलावी. विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी जास्तीत जास्त वाव मिळेल अशी वर्गरचना ठेवावी.
- ✓ पाठातील विविध चौकटी व त्या संदर्भात सूचना देणारे 'ग्लोबी' हे पात्र विद्यार्थ्यांमध्ये प्रिय होईल असे पाहावे. ज्याद्वारे त्यांच्यामध्ये विषयाची गोडी निर्माण होऊ शकेल. यासाठी शाळेत 'ग्लोबी क्लब' सुरू करावा.
- × सदर पाठ्यपुस्तक रचनात्मक पद्धतीने व कृतियुक्त अध्यापनासाठी तयार केलेले आहे. सदर पाठ्यपुस्तकातील पाठ वर्गात वाचून शिकवू नयेत.
- ✓ संबोधांची क्रमवारिता लक्षात घेता, पाठ अनुक्रमणिकेनुसार शिकवणे विषयाच्या सुयोग्य ज्ञाननिर्मितीसाठी सयुक्तिक ठरेल.
- ✓ पाठ्यपुस्तकात करायच्या कृतींसाठी पेन्सिलचा वापर करण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात.
- ✓ 'माहीत आहे का तुम्हांला?' हा भाग मूल्यमापनासाठी विचारात घेऊ नये.
- ✓ पाठ्यपुस्तकाच्या शेवटी परिशिष्ट दिले आहे. पाठांतील महत्वाच्या भौगोलिक शब्दांची/संकल्पनांची विस्तृत माहिती या परिशिष्टात दिली आहे. परिशिष्टातील शब्द वर्णानुक्रमे दिले आहेत. या परिशिष्टात आलेले हे शब्द पाठांमध्ये निळ्या चौकटीने दर्शवलेले आहेत. उदा., 'उद्देशात्मक नकाशे' (पाठ क्र. १, पृष्ठ क्र. १.)
- ✓ परिशिष्टाच्या शेवटी संदर्भासाठी संकेतस्थळे दिलेली आहेत, तसेच संदर्भासाठी वापरलेल्या साहित्याची माहिती दिलेली आहे. तुम्ही स्वतः तसेच विद्यार्थ्यांनी या संदर्भांचा वापर करणे अपेक्षित आहे. या संदर्भ साहित्याच्या आधारे तुम्हांला पाठ्यपुस्तकाबाहेर जाण्यास नक्कीच मदत होईल. विषय सखोल समजण्यासाठी विषयाचे अवांतर वाचन नेहमीच उपयोगी असते, हे लक्षात घ्यावे.
- ✓ मूल्यमापनासाठी कृतिप्रवण, मुक्तोत्तरी, बहुपर्यायी, विचारप्रवर्तक प्रश्नांचा वापर करावा. पाठांच्या शेवटी स्वाध्यायात यांचे काही नमुने दिलेले आहेत.
- ✓ पाठ्यपुस्तकातील 'क्यू आर कोड' वापरावा.




## – विद्यार्थ्यांसाठी –






**ग्लोबीचा वापर** : या पाठ्यपुस्तकात पृथ्वीगोलाचा वापर एक पात्र म्हणून केला आहे. त्याचे नाव आहे 'ग्लोबी'. हा ग्लोबी प्रत्येक पाठात तुमच्या सोबत असेल. पाठातील विविध अपेक्षित बाबींसाठी तो तुम्हांला मदत करेल. प्रत्येक ठिकाणी त्याने सुचवलेली गोष्ट तुम्ही करण्याचा प्रयत्न करा.



# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | क्षेत्र | पृष्ठक्रमांक | अपेक्षित तासिका |
|---|---|---|---|---|
| १. | वितरणाचे नकाशे | प्रात्यक्षिक भूगोल | १ | ०८ |
| २. | अंतर्गत हालचाली | प्राकृतिक भूगोल | ९ | ०८ |
| ३. | बाह्यप्रक्रिया भाग-१ | प्राकृतिक भूगोल | २३ | ०८ |
| ४. | बाह्यप्रक्रिया भाग-२ | प्राकृतिक भूगोल | ३० | ०८ |
| ५. | वृष्टी | प्राकृतिक भूगोल | ४१ | ०८ |
| ६. | सागरजलाचे गुणधर्म | प्राकृतिक भूगोल | ५० | ०८ |
| ७. | आंतरराष्ट्रीय वाररेषा | सामान्य भूगोल | ५७ | ०७ |
| ८. | अर्थशास्त्राशी परिचय | मानवी भूगोल | ६४ | ०७ |
| ९. | व्यापार | मानवी भूगोल | ६७ | ०८ |
| १०. | नागरीकरण | मानवी भूगोल | ७५ | ०८ |
| ११. | वाहतूक व संदेशवहन | मानवी भूगोल | ८२ | ०८ |
| १२. | पर्यटन | मानवी भूगोल | ८८ | ०८ |
| | परिशिष्ट | | ९७ | |



**S.O.I. Note :** The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2017. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on these maps are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The exernal boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in these maps, have been taken from various sources.

**DISCLAIMER Note :** All attempts have been made to contact copy righters (©) but we have not heard from them. We will be pleased to acknowledge the copy right holder (s) in our next edition if we learn from them.


**मुखपृष्ठ :** नैसर्गिक क्रियांमुळे निर्माण झालेली भूरूपे, जसे, अपपर्णित खडक, समुद्रकिनारा (पुळण), समुद्रगुहा, खडकांचे उभे स्तंभ व झाडांच्या मुळांनी झालेले जैविक विदारण.

**मलपृष्ठ :** 'व्ही' आकाराची दरी, किरकोळ विक्रेता, कठीण खडकातील मानवनिर्मित गुहा, घाऊक व्यापारी व सैफ टेकड्या.